कृषि मित्र कर्ज योजना २०२२-२३ करिता कृषि कर्ज मित्र म्हणुन सेवा देवु ईच्छीणाऱ्या व्यक्तीने ३० एप्रील २०२२ पंर्यत जिल्हा परिषदेच्या संकेतस्थळावर नोंदणी करावी.

Scanned with CamScanner

**जिल्हा परिषद, वर्धा**
**योजनेचे नांव :- कृषि कर्ज मित्र योजना**

**प्रस्तावना**

शेतकऱ्यांना खरीप व रब्बी हंगामाकरिता राष्ट्रीयकृत बँका, सहकारी बँका, खाजगी बँका व पतपेढयांमार्फत मोठया प्रमाणांवर कर्ज पुरवठा केला जातो. यामध्ये ही शेतकऱ्यांचा कल हा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडे जास्त असतो. सहकारी बँककडुन विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटयामार्फत कर्जाचे वितरण केले जाते. सर्वसाधारणपणे शेतकरी नवीन पीक कर्ज, मध्यम व दीर्घ मुदतीचे कर्ज घेतो. हे कर्ज घेत असताना त्याला ७/१२ पासुन ते बँकाचे नाहरकत प्रमाणपत्रापर्यंतची सर्व कागदपत्रे गोळा करावी लागतात. यासाठी बराच कालावधी लागतो व कधी कधी तर हंगाम ही संपुन जातो. केवळ कागदपत्रांच्या पुर्तते अभावी त्यास वेळेवर कर्ज मिळत नाही. नाईलाजस्तव त्याला खाजगी सावकाराकडुन जास्तीच्या व्याजाने कर्ज घ्यावे लागते. अशाप्रकारे शेतकऱ्यांना बँकेमार्फत कर्ज मिळविण्यासाठी अनेक अडचणींना तोंड दयावे लागते.

शेतकऱ्यांना वेळेत व सुलभरित्या कर्ज उपलब्ध होण्याच्य दृष्टिने जिल्हा परिषदेच्या कृषि विभागाकडुन **कृषि कर्ज मित्र योजना** राबविण्यात येत आहे.

**योजनेचा उद्देश :-**

शेतकऱ्यांना कृषि कर्जाची उपलब्धता सहजतेने व विनाविलंब होण्यासाठी सहाय्य करणे व त्याद्वारे भांडवलाची गुंतवणुक वाढवुन कृषीक्षेत्राचा विकास साधणे.

**योजनेचे स्वरुप :-**

दरवर्षी खरीप, रब्बी हंगामाध्ये शेतकरी पिक कर्ज घेत असतात लागवडीखालील क्षेत्र व एकुण पिक कर्ज वाटप पाहीले असता यात विषमता आढळते. कृषि क्षेत्रात भांडवलाचा औध व गुंतवणुक वाढवुन कृषि क्षेत्राच्या विकासात अधिकची भर पडणे आवश्यक आहे. सुक्ष्म निरिक्षण केल्यास तेच-तेच लाभार्थी वेगवेगळया बाबीसाठी कर्ज घेत असल्याचे दिसुन येते. त्यामुळे त्यांच्या शेती क्षेत्रात विकास झालेला दिसुन येतो. या शेतकऱ्यांव्यक्तीरिक्त ज्यांना कर्ज घेण्याची इच्छा आहे परंतु कर्ज प्रकरणाविषयीचे अज्ञान, घरी कर्ता पुरुष म्हणुन एकटाच असणे इत्यादी कारणांमुळे हंगामात कामाच्या लगबगीमुळे व वेळेच्या अभावा मुळे कर्ज प्रकरण करणे शक्य होत नाही.

अशा इच्छुक पात्र शेतकऱ्यांना कृषि कर्ज सहज सुलभतेने त्यांच्या मागणी नुसार वेळेत उपलब्ध होण्यासाठी त्यांना प्रशिक्षीत स्वयंसेवकाची मदत/ सहाय्य देणे गरजेचे आहे. ही बाब लक्षात घेऊन कृषि कर्ज मित्र यांच्या मदतीने गरजु पात्र शेतकऱ्यास ज्या बाबीसाठीचे कर्ज आवश्यक आहे. असे प्रकरण कृषि कर्ज मित्र यांच्या सहाय्याने तयास केल्यास शेतकऱ्यांस वेळेत कर्ज उपलब्ध होईल.

**प्रति प्रकरण सेवाशुल्काचा दर**

**अ) अल्प मुदतीचे कर्ज :-**

१. प्रथमत: पीक कर्ज घेणारा शेतकरी :- प्रति प्रकरण सेवाशुल्क रुपये १५०/-

**ब) मध्यम व दिर्घमुदतीचे :-**

१. नविन कर्ज प्रकरण :- प्रति प्रकरण सेवाशुल्क रुपये २५०/-
२. कर्ज प्रकरणाचे नुतनीकरण :- प्रति प्रकरण सेवाशुल्क रुपये २००/-

**कृषि कर्ज मित्र नोंदणी :-**

१. कृषि कर्ज मित्र म्हणुन सेवा देऊ इच्छीणाऱ्या व्यक्तीने जिल्हा परिषदेच्या संकेतस्थळावर नोंदणी करावी.
२. नोंदणी झालेल्या इच्छुक व्यक्तीची यादी तयार करुन त्यास कृषि समितीची मान्यता घेण्यात येईल.
३. जिल्हा परिषदेकडील कृषि समितीस अंतिम निवडीचे अधिकार रहातील.

Scanned with CamScanner

कृषि कर्ज मित्राने ज्या शेतकऱ्यांना कृषि कर्जाची आवश्यकता आहे. त्यांना भेटी देऊन कर्ज प्रकरणाच्या कार्यपध्दतीची सविस्तर माहीती द्यावी. कर्ज प्रकरणासाठी आवश्यक लागणारी कागदपत्रे गोळा करुन शेतकऱ्यांच्या संमतीने कर्ज प्रकरण तयार करावे व मंजुरीसाठी बँकेमध्ये सादर करेल. कृषि कर्ज मित्र हा बँक व शेतकरी यांच्यामधील मध्यस्थाच्या भुमिकेऐवजी सहाय्यक व सल्लागाराची भुमिका बजावेल.

कृषि कर्जमित्राचे पारदर्शी व प्रामाणिकपणे शेतकऱ्यांस सहाय्य करणे व सल्ला देणे विषयी बंधपत्र देणे आवश्यक आहे.

**<u>कृषि कर्ज मित्रास सेवाशुल्क देण्याची कार्य पध्दती :-</u>**

कृषि कर्ज मित्रास सेवा शुल्क देण्यासाठी तालुका स्तरावर खालील प्रमाणे समिती गठीत करण्यात यावी.

**<u>तालुका स्तर समिती :-</u>**

| | | |
|---|---|---|
| १. | गट विकास अधिकारी | :- समिती अध्यक्ष |
| २. | सहाय्यक निबंधक सहकारी संस्था | :- सदस्य |
| ३. | जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचा प्रतिनिधी | :- सदस्य |
| ४. | जिल्हा अग्रणी बँकेचा प्रतिनिधी | :- सदस्य |
| ५. | तालुका कृषि अधिकारी | :- सदस्य |
| ६. | कृषि अधिकारी पंचायत समिती (सर्वसाधारण) | :- सदस्य सचिव |

१. कृषि कर्ज मित्र शेतकऱ्याच्या शिफारशीसह सेवाशुल्क मागणी यादी बँकेकडे सादर करेल.

२. बँकेकडुन त्याची शहानिषा करुन बँक त्या गटातील गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांचेकडे सेवाशुल्क अदायगीसाठी यादी सादर करेल.

३. तालुका स्तरावरील समिती त्याची शहानिषा व खात्री करुन सेवाशुल्क संबंधित कृषि कर्ज मित्रास आरटीजीएसद्वारे अदा करण्याची शिफारस करेल.

४. सेवा शुल्कावरील होणारा खर्च हा त्या वर्षाच्या योजनेच्या उपलब्ध निधीतुन गट विकास अधिकारी यांनी भागविणेचा आहे.

**<u>योजनेचा कालावधी :-</u>**

सदर योजनेचा कालावधी हा सन २०२२-२३ हे आर्थिक वर्ष राहील. आवश्यकतेनुसार योजनेचा कालावधी कमी करणे, किंवा वाढविण्याचे अधिकार जिल्हा परिषदेचा रहील.

**<u>निधीचा स्त्रोत व रक्कम :-</u>**

जिल्हा परिषद स्वनिधि सन २०२२-२३ चे अंदाजपत्रक
लेखाशिर्ष -२४०१ कृषि
रक्कम रुपये ८,००,०००/- (रुपयेआठ लाख फक्त)

कृषि विकास अधिकारी,
जिल्हा परिषद, वर्धा

Scanned with CamScanner